स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्र विभाग अंतर्गत समाजशास्त्र विषयात

पीएच.डी साठी संशोधन आराखडा

शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलांसमोरील आव्हानांचा समाजशास्त्रीय अभ्यास: विशेष संदर्भ–लातूर जिल्हा

२०१५ – २०१६

संशोधक

राजकुमार जोंधळे

मार्गदर्शक

डॉ. एस.पी.घायाळ

स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरुर ताजबंद ता.अहमदपूर जि. लातूर

I प्रस्तावना :—

महिलांची ऐतिहासिक पार्श्वभुमी :—

थंड होत जाणारी पृथ्वी,सगळीकडे पाणी, भूभाग व त्याच बरोबर पाण्याच्या तळाशी अनामिक गुण हालचाल वाढु लागली. व त्यातुन एक पेशी समुद्री जिवाची निर्मिती झाली. एक पेशीतुन दुसरी, दुसरीतुन तिसरी अशा पेशीच्या असंख्य समुहातुन एक बहुपेशी जिवाची निर्मिती झाली. त्यात काही जीव पाण्यात राहणारे म्हणजे जलचर व जमीनीवर राहणारे भूचर जीव उदयास आले. याच बरोबर या जिवांगापैकी निसर्ग ज्याचा पुनरुत्पादनासाठी नैमितिक उपयोग करुन घेतो त्याला आपण नर म्हणतो. आणि दुसरे जीवांग जे निसर्गाच्या निर्माण संरक्षण, संवर्धन या निसर्गाचा भार उचलते त्याला मादी असे संबोधन आहे नवीन जीवाच्या निर्मितीसाठी दोन्ही जीवांची गरज सारखीच आहे. तरी सुध्दा निसर्गाने सोपविलेले नवविर्माणाचे प्रत्यक्ष काम करणारे जीव म्हणजे मादी जीव म्हणुन निसर्गाने मादी जीवात शारीरिक व मानसिक विशेष क्षमता निर्माण केलेल्या दिसतात. उदा. अंडे वा पिल्ले घालताना सावधता, त्याच्या रक्षणाची जबाबदारी पोषण, संरक्षण, शिक्षण, अपरीचित शत्रुसाठी रागीटपणा व स्वपत्याबद्दल कमालीचे वात्सल्य इ.क्षमता

निसर्ग अवस्थेतील स्त्री—पुरुषाचा विचार करता. आजच्या माणसासारखे फिरणारे वेळ प्रसंगी झाडावर चढुन बसणारे काही प्रमाणात विचारशक्ती असणारी ही मानव जात नग्नावस्थेत जंगल कडेकपारीतुन हिंडणारी केस, नखे, वाढलेल्या अवस्थेत दऱ्याखोऱ्यातुन धावणारी अशी होती. त्याच बरोबर इतर स्थन प्राण्यापेक्षा सुधारीत विचार शक्ती होती. निसर्ग अवस्थेतील स्त्रीला पुरूषांच्या तुलनेत एका जागी शांतपणे काही काळ तरी स्थिर बसण्याची वेळ स्त्रियांवर मुलांमुळे जास्त येत असे. त्याच बरोबर स्त्रीच्या मुक्त लैंगीक संवेदनाना पुरूषांचा कोणताही विरोध नव्हता. त्याच बरोबर स्त्रीला मुले पुरूषापासुन होतात. हे सत्य स्त्री व पुरूष दोघानां ही समजलेले नव्हते. त्याच बरोबर स्त्री—पुरूषांच्या ताकदीचा विचार करता जंगलातील स्त्री व पुरूष जीवन सारखेच कष्टप्रद होते. कायम स्वरुपी निवारा नाही. भटके जीवन त्यात थेट स्त्रीवर थेट मुलांची जबाबदारी त्यामुळे त्या काळातील स्त्रीही पुरूषाप्रमाणे ताकदवर व भयानक हिंस्र स्वरूपाची होती. कारण स्त्री—पुरूषाची जीवन पध्दती एकाच पध्दतीच्या श्रमावर होती.

स्त्रीयांच्या स्थिर जीवन पध्दतीमुळे त्यानी अनेक क्षेत्रात नवीन शोध लावले. त्यामध्ये त्यामध्ये शिकारीला निघणाऱ्या पुरूषासाठी स्त्रीयांनी कातडी वस्त्र तयार केले. झाडाच्या बांबुच्या टोपल्या, परडया विणण्याचे स्त्री बुध्दी चालु लागली. शिवणकाम,विणकाम असे लघुउद्योग स्त्रीयांनी चालु केले. माती भाजल्यानंतर कडक होते. हे समजल्यानंतर माती पासुन भांडी तयार करता येते. हे स्त्रीला लक्ष्यात आले. व कुंभार कलेचा उदय झाला. स्थिरतेमुळे स्त्रीला पशुपालन जमु लागले. आणि त्यातुन ती दुधाचा व्यवसाय करू लागली. शेती व्यवसायातुन तिला उपकारक व विषारी वनस्पतीची समज आली. त्यामुळे पुरूषापेक्षा स्त्रीला औषधी वनस्पतीचे ज्ञान अधिक मिळत गेले. कुटुंबियांना रोगमुक्त करणे सोपे झाले आहे. इ. क्षेत्रात स्त्रीने मिळवलेल्या वर्चस्वामुळे हळु हळू स्त्री ही समाजामध्ये केंद्रस्थानी बनत गेली. याच काळात समाजात मातृसत्ताक कुटुंब पध्दती अस्तीत्वात आली. आणि कुटुंबातील सर्व अधिकार स्त्रीच्या हाती आली व पुरूष तिचा मित्र, भाऊ, मुलगा, मित्र, पुरूष { लैंगिक सहकारी } म्हणुन काम करू लागले.

इ.स. पुर्व २ ते ३ हजार वर्षे सुमारास नांगराचा शोध माणसाला लागला. नांगराच्या शोधामुळे आणि त्या सुमारास ऋतुमानाचे भान माणसाला आल्यानंतर शेती तंत्रात झपाटयाने बदल झाला. त्यातुन

नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी, झाडणी अशा अनेक क्रियामधुन शेती होउ लागली. या अगोदर स्त्रीया अनकुचीदार शस्त्राने हाताने जमीन उकरून बी पेरून घेत असत हे कष्टदायक आणि वेळखाऊ होते. व त्यातुन ठराविक उत्पन्न होत असत. परंतु नांगराच्या शोधामुळ शेतीत मोठया प्रमाणात उत्पन्न घेतले जाउ लागले त्यामुळे शेती हे एकटया स्त्रीचे काम राहिले नाही आपले मुले भाऊ व लैंगीक सहकारी पुरूष यांच्या मदतीने नांगर शेती होउ लागली.येथुनच पुढे शेती व्यवसाय पुरूषाचा प्रवेश झाला. व त्याच बरोबर नांगराने भरपुर प्रमाणात धान्य निघु लागले. हे धान्य मातृगणालापुरून त्याचा साठा करण्यात येऊ लागला. येथुन या शेतीव्यवसायातील क्रांतीमुळे स्त्रीशी निगडीत असलेले दुग्धव्यवसायापासुन इतर सर्व व्यवसाय दुय्यमतेकडे ढकलले गेले. शेती व्यवसाय पुरुषाची भागीदारी स्त्री बरोबर येउ लागली. व त्यातुन पुरूषाचे वर्चस्व निर्माण झाले. व मातृसत्ताक कुटुंब पध्दतीला तडा जाउ लागला. शेती व्यवसायाबरोबर अनेक व्यवसायातुन स्त्रीची पिछेहाट होउ लागली. स्त्रीची जागा गुलामांनी घेतली. युध्दात जो गुलाम जिंकुन आनु लागला. तो स्वामी बनला. दुस—याला आपण पोसु शकतो. या जोरावर पुरूष हवे ते घडुन आणने शक्य झाले. पुरूषाचे स्थान बदलु लागले. व स्त्रीच्या स्थानाला धक्के बसु लागले. सामाजिक पातळीवर शिरकाव केलेल्या पुरूषाने कौटुंबिक पातळीवर ही स्वत:चे महत्व हर एका प्रयत्नाने निर्माण करून अखेर सत्ता प्राप्त केली.

स्त्री—पुरूष संबधातुन मुल होते हे सत्य पशुपालनातुन मानवाला केव्हाच कळुन चुकले होते. ती मुले तशी आपली ही आहेत तशी जानीव पुरूषाना झाली होती स्त्रीला अनेक पुरूषापासुन होणाऱ्या अपत्यांमुळे नेमकी स्वत:ची मुले ओळखता येतील असा कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता. पुढे स्त्रीला एकाच पुरूषाबरोबर बध्द करावी आणि त्यातुन आपली मुले कोणती ते समजता येतील. हे सुचले. त्यातुन स्त्रीचे अमुक एका पुरूषाबरोबर संबंध जोडले गेले. हे व समाज साक्षीने विधिपुर्वक जाहीर केले गेले. यातुन विवाह प्रथा निर्माण झाली.

ही विवाह प्रथा म्हणजे स्त्रीचा निसर्गातुन आलेला लैंगिक अधिकार धुडकावुन लावण्याचा पहिला प्रयत्न होता.त्याचप्रमाणे मातृसत्ताक कुटुंबाचा पाया ढासाळला व पितृसत्ताकुटुंबाची उभारणी होऊ लागली. त्यातुन स्त्रीयांचे स्थान दुय्यम होत गेले. स्त्री बंधीस्त होत गेली. समाजातील सर्वच क्षेत्रात पुरूषांचे वर्चस्व वाढत गेले. स्त्रीया हया फक्त भोगा पुरत्या मर्यादित राहील्या. त्यात धर्मातही स्त्रीयांचे स्थान कमी लेखले जाऊ लागले. मनुस्मृती ही तर स्त्री निंदेची गीता म्हणावी यात स्त्री आणि शुद्र व त्याचप्रमाणे जनावरे याचा मनु एकत्रितपणे उल्लेख करतो. स्त्रीला पतीची मालमत्ता समजतो. स्त्रीला असंख्य बंधने घालणारी ही मनुस्मृतीचा विचार समाजात रूजत गेला व स्त्री दास्य बनली. हळु हळु समाजात स्त्रीवर अत्याचार वाढत गेले ती फक्त चुल आणि मुल इतकेच मर्यादित राहिले धार्मिक, आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक अधिकारापासुन वंचित राहिली.

स्त्रीवर अन्याय करणाऱ्या अनेक अशा प्रथा समाजात रूजु झाल्या. त्यात पडदा पध्दत,सती प्रथा,देवदासी,केशवपण,विधवांना पुर्नविवाहाचे बंधन, बालविवाह अनेक पत्नी विवाह पध्दती इ. अनिष्ट प्रथेमुळे स्त्रीयांचे जीवन दुखी यातनापुर्ण कष्टमय मागास राहिले व स्त्रीही फक्त भोग वस्तुच्या स्वरूपात जगु लागले.

स्त्रीमुक्तीची चळवळ

सतराव्या आणि आठराव्या शतकापासुन युरोपात होत चाललेली वैचारीक क्रांती आणि त्यामधुन प्रथमच होणारा स्त्री दास्याचा विचार व विरोधी चळवळ याचे लोणे ब्रिटीशामार्फत एकोणिसाव्या शतकाच्या आरंभात येऊन धडकावतो आणि प्राचिन काळातच लुप्त झालेली स्त्री मुक्ती भारतीय प्रवासात पुनश्च चालना मिळावी. याची सुरवात राजा राम मोहन राय आणि द्वारकानाथ टागोर या आद्य सुधारकापासून झाली. इंग्रजी शिक्षणात युरोपचा इतिहास होता. हे शिक्षण घेणारे विचारवंत चक्राऊन गेले. राजसत्ते विरोधी, धर्मविरोधी विचार आणि जमीनदारी विरोधी चळवळ, राजक्रांत्या या इतिहासामुळे भारताच्या या पहिल्या विधवानांना समाज सुधारणेची, लोकशाही स्वातंत्र्याची, व्यक्ती स्वातंत्र्याची,नवी दृष्टी मिळाली आणि त्यांच्या लक्षात आले की आपल्या जुन्या संस्था या जगातील सर्वोत्तम व श्रेष्ठ संस्था नव्हे. जगात आपल्यापेक्षाही सुधारलेली नव्या विचाराची,नव्या न्यायाने समतेने विचार करणारी मानसे आहेत. अर्थातच त्यांना आपल्या जातीसंस्था, आस्पृश्यता, बहुपत्नीत्व, पडदा पध्दत, बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाहास बंधी, या सर्व सामाजिक प्रथा अत्यंत मागासलेपनाचे चिन्ह आहेत हे कळुन आले. आणि त्यांनी त्यावर आपल्या लेखनातुन हल्ले चढविले.

भारतीय स्त्री मुक्तीच्या चळवळीत राजाराम मोहन राय, महात्म फुले, आगरकर,न्या. रानडे,लोकहितवादी देशमुख, रा.गो.भांडारकर, न्या. तेलंग, पंडीत रमाबाई, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांचे योगदान उल्लेखिनिय आहे. या सर्व विचारवंतानी बंधनात अडकलेल्या स्त्रीला मुक्त करण्यासाठी अनेक आंदोलने केली. राजाराम मोहन राय यांच्या प्रयत्नाने सती प्रथा बंध झाली. महात्मा फुले यांनी स्त्रीयासाठी पहिली शाळा काढली. केशवपन सारखी अनिष्ठ प्रथा बंद पाडली. डॉ.आंबेडकरांनी हिंदू कोड बिलातुन स्त्रीयांना पुरुषाच्या बरोबरीने अधिकार प्राप्त करुन दिले. अगरकरांनी जे जे पुरुषांना अधिकार स्वातंत्र्य आहेत ते ते स्त्रियांना दिले पाहिजेत असे विचार व्यक्त केला. महर्षी कर्वे यांनी एस.एन.डी.टी विद्यापीठाची स्थापना केली इत्यादी विचारवंताच्या कामगिरीमुळे स्त्रीमुक्तीची पहाट झाली. स्त्री ही शिक्षण घेऊ लागली मतदानाचा अधिकार कौटुंबिक अधिकार प्राप्त झाला बंधिस्त जीवन मुक्त झाले. नौकऱ्या करु लागल्या, राजकारणात सक्रिय झाल्या आणि आजची स्त्री काही प्रमाणात का होईना पुरुषाप्रमाणे मुक्त असलेली दिसून येते.

अभ्यास विषयाची निवड

मानवाला प्रारंभी पासूनच आपल्या भोवती घडणाऱ्या घटनाविषयी आकर्षन व कुतूहल वाटत आहे या संपूर्ण घटना व त्यांच्या संदर्भातील सर्व गोष्टीची माहिती जाणुन घेण्याचा प्रयत्न तो नेहमीच करत आलेला आहे. इतर प्राण्याप्रमाणे मानव जिज्ञासू वृत्तीचा आणि बुध्दीजीवी प्राणि आहे त्यामुळे तो नैसर्गिक घटना व तसेच सामाजिक घटना बाबत माहिती मिळविण्याचा प्रयत्न नेहमी करीत असतो या सर्व आज्ञान बाबीची माहीती करुन घेण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

‘‘ कोणती तरी सामाजिक समस्येच्या सोडवणुकीसाठी केलेले पध्दतशिर आणि शास्त्रीय चिंतन म्हणजे संशोधन होय. त्यासाठी संशोधकाला विशिष्ट तंत्राचा आणि सांख्यिकीय पध्दतीचा उपयोग करावा लागतो.’’

स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या काळात भारतीय स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होत गेली स्त्री शिक्षणाचा पुरस्कार झाला, पुरुषाप्रमाणे स्त्रियांना शासकिय क्षेत्रात नौकरीची संधी प्राप्त झाली जे जे पुरुषांना अधिकार प्राप्त झाले ते ते अधिकार स्त्रीयांना सुध्दा देण्यात आले. ती नौकरी करु लागली, उदयोग व्यवसाय खाजगी क्षेत्र इत्यादी अनेक क्षेत्र स्वबळावर काबीज केले आणि त्या त्या क्षेत्रात आपला ठसा उमठवला त्यापैकी एक क्षेत्र म्हणजे शासकीय क्षेत्र होय. पोलीस,टपाल सेवा, सरकारी दवाखाने, न्यायालय, इ. शासकीय सेवेत स्त्री काम करु लागली आहे. या सेवेत काम करत असताना स्त्रीयांना अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते त्यामध्ये सामाजिक,आर्थिक आव्हाने त्याचबरोबर कामाच्या ठिकाणी वरिष्ट अधिकाऱ्याकडून होणारा त्रास कामाचे ठिकाण, कामाची वेळ, कामाच्या ठिकाणी होणारा भ्रष्टाचार, अचानक होणारी बदली इत्यादी समस्यांना स्त्रीला सतत तोंड दयावे लागते म्हणुन त्यामुळे मी माझ्या संशोधनाचा विषय ‘‘**शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलांसमोरील आव्हानांचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा**’’ हा निवडला आहे.

कारण माझ्या प्राथमिक निरीक्षणात तसेच अभ्यासातुन दिसुन आले आहे की लातूर जिल्हयातील शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलांना अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते आणि त्याचे प्रमाण देखिल अधिक आहेत लातूर मराठवाडयातील एक जिल्हा असुन १० तालुके आहेत आणि या जिल्हयात शासकीय सेवेत काम करणाऱ्या स्त्रिांयाची संख्या अधिक आहे त्याच बरोबर त्यांना तोंड दयावी लागणारी आव्हाने देखिल अधिक आहेत म्हणुन मी माझ्या संशोधनाचा अभ्यास विषय लातूर जिल्हयातील शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिला समोरील आव्हाने हा आहे.

सैधांतिक दृष्टीकोन :

प्रस्तूत संशोधन कार्यात बहूआयामी सैधांतिक दृष्टीकोनाचा वापर करणार आहे.

संशोधन विषयाचा आढावा/ संशोधन विषयक साहित्य आढावा

संशोधन समस्या निश्चित केल्या नंतर प्रस्तुत समस्येचा व्यापक वस्तुनिष्ठ अशा दृष्टिकोनातुन आभ्यास व्हावा संशोधनाची दिशा निश्चित व्हावी म्हणुन संशोधन साहित्याचा आभ्यास आवश्यक असतो. कोणत्याही प्रकारचे संशोधन कार्याची सुरुवात करण्यापूर्वी त्या संशोधनाच्या संबंधात पुर्वी झालेल्या संशोधनाचा आभ्यास करणे आवश्यक असते त्यामुळे संशोधनाची पुर्नरावृत्ती टाळता येऊन संशोधनातील त्रुटी दुर करता येतात शिवाय संशोधकाला एक स्वातंत्र दिशा प्राप्त होते त्यामुळे साहित्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

म्हणुन मी प्रस्तुत संशोधन कार्य सुरु करण्यापूर्वी या संशोधना बाबतीत यापूर्वी कोणी कोणी संशोधन केले आहे याचा आढावा घेणार आहे. पुढील प्रमाणे प्राथमिक निरीक्षणात तसेच अभ्यासातून मला वेगवेगळे संशोधन निदर्शनास आले आहे.

१. **खन्ना एस.के. :—**

वुमन ॲन्ड हयुमन राईटस या आध्यनात महिलांच्या राजकीय सशक्तीकरणाचा उल्लेख करताना असे म्हंटले आहे की,‘‘ राष्ट्रीय महिला आयोगाने महिलांची राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी

अधिनियम—१९९० ची मांडणी केली. या अधिनियमात अशी शिफारस आहे की, केंद्र सरकारच्या मंत्रालयात, राज्यसरकारच्या विभागात, पोलीस तथा न्यायसेवा, पब्लीक अंडर टेकींग्स मध्ये, विद्यापीठात ३३ टक्के पद प्रत्येक स्तरावर महिलांसाठी आरक्षित केले जाईल हे कार्य १० वर्षापर्यंत चालू राहिल.

२. गुप्ता एन. एल. :—

यांनी आपल्या इंडीयन वुमेन्स या आध्ययनात नौकरी करणाऱ्या महिलांनी आपल्या समुदायातील सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेत परिवर्तन केले आहे असा निष्कर्ष काढला आहे. वर्ष १९९९ मध्ये महिलांनी आपल्या भुमिकेद्वारा आपल्या परिस्थिती परिवर्तनप घडवुन आणले आहे. या परिक्षणात असे दिसून आले आहे की भारतात रोजगाराच्या क्षेत्रात महिलांनी प्रभावीपणे पाऊल टाकले आहे त्यामुळे देशातल्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडुन आले आहे.

३. टाईम्स ऑफ इंडीया १३ मे २००३ :—

दिल्ली हायकोर्टात लिला शेठ नावाच्या महिला न्यायाधिश बनल्यावर अन्य न्यायाधिशाच्या परिस्थितीची तुलना केल्यास तिच्या सोबत असमानतेचा उल्लेख केला आहे. लिला शेठ या महिला न्यायधिशाला ती महिला आहे म्हणुन तिच्या आईच्या आजारपणाला पैसे दिले गेले नाहीत.

४. के.के तिवारी :—

वुमेन एज्युकेशन ॲन्ड नॅशनल डेव्हलपमेंट या अध्ययनात महिलांच्या परिस्थितीत सुधारने विषयी भर दिला आहे. महिलांच्या परिस्थितीत सुधार आणण्यासाठी गंभीर प्रयत्न केला पाहिजेत विशेषत: सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात शिक्षा आणि विकासाच्या हेतुने समान वेतन व आर्थिक स्वातंत्र्य दिले पाहिजे.

५. जास्मीन लॉरेन्स :—

'' महिला श्रमिकांची सामाजिक स्थिती आणि समस्या'' या अध्ययनात त्यांनी मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्हयातील महिला श्रमिकांची कौंटुबिक स्थिती आणि महिलाबाबत सामाजिक दृष्टिकोन आणि महिला श्रमिकांच्या बाबतीत राजकीय चेतनाचा अभ्यास केला आहे.

६. सलामपुरे फुलचंद भगीरथ :—

'' औरंगाबाद जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्त्री सफाई कामगारंचा समाजशास्त्रीय अभ्यास''. या शोध निबंधात त्यांनी स्त्री सफाई कामगारांची अर्थिक,शैक्षणिक व सामाजिक स्थिती अभ्यासली आहे. स्त्री कामगाराचे वय आणि जातीच्या आधारावर विभागणी केली, त्यांच्या समस्यांचा अभ्यास त्यांना मिळणाऱ्या प्रशासकीय पातळीवरील सेवा योजनांचा अभ्यास केला.

७. रश्मी वर्मा :—

'' झॉसी शहरातील महिला कर्मचारींच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास'' या शोध निबंधात त्यांनी झॉसी शहरातील महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, परिस्थितीची अभ्यास केला आहे.

८. डॉ. सुशिला फुले :—

‘‘ कामगार स्त्री ’’ या शोध निबंधात औरंगाबाद शहरातील कामगार स्त्रीची आर्थिक, सामाजिक कौटुंबिक, कारखान्यातील दर्जा, संघटनेतील सहभाग या विषयी संशोधन सादर केले आहे.

इत्यादी पूर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा अभ्यास करुन मी माझे संशोधन कार्य पुर्ण करणार आहे.

II संशोधनाचे उददेश

१ लातूर जिल्हयातील शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलासमोरील सामाजिक व आर्थिक आव्हानांचा शोध घेणे.

२ लातूर जिल्हयातील शासकीयसेवेत काम करणाऱ्या महिला समोरील कौटुंबिक आव्हानांचा शोध घेणे.

३ लातूर जिल्हयातील शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलासमोरील आव्हानांच्या कारणाचा शोध घेणे.

४ शासकीय सेवेत सतत होणारी बदली आणि कार्यालयातील भ्रष्टाचार यामुळे महिलांना सहन करावे लागणाऱ्या मानसिक व शारीरिक आव्हानांचा शोध घेणे.

५ शासकीय सेवेत काम करताना महिलासमोर जे आव्हान निर्मान होतात ते आव्हान सोडविण्यासाठी काय उपाययोजना आहेत त्याचा शोध घेणे.

III संशोधनाचे गृहितकृत्य :—

पोलीस, टपाल, दवाखाने, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायालय, शासकीय क्षेत्रात अनेक महिला काम करताना आपणास दिसून येतात. काम करते वेळेस त्यांना अनेक आव्हानांना तोंड दयावे लागते. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, कौटूंबिक, तसेच पुरुषांच्या मानसिक व शारीरीक आत्याचाराला स्त्रीयांना सामोरे जावे लागले त्याच बरोबर शासकिय सेवेत काम करत असताना कामाचे ठिकाण हे सुध्दा एक आव्हान आहे. भ्रष्टाचार, सतत होणरी बदली या सर्व आव्हानांना स्त्रीला सामोरे जावे लागते. यामुळे स्त्रीचे काम करणे हे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे.

१ पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमुळे सामाजिक व आर्थिक आव्हानांना तोंड दयावे लागते.

२ महिलांच्या दुहेरी भूमिकेमुळे कौटुंबिक आव्हानांना सामोरे जावे लागते.

३. शासकीय सेवेत काम करताना महिलांची सतत होणरी बदली व कार्यालयातील भ्रष्टाचार यामुळे मानसिक व शारीरिक आव्हानांना तोंड दयावे लागते.

IV संशोधनाचे महत्व

१ प्रस्तुत संशोधनातुन शासकिय सेवंत काम करणाऱ्या महिलासमोरील सामाजिक व आर्थिक आव्हानांची माहिती मिळेल.

२ प्रस्तुत संशोधनातुन शासकिय सेवंत काम करणाऱ्या महिलासमोरील कौटुंबिक आव्हानांची माहिती मिळेल.

३ प्रस्तुत संशोधनातुन शासकिय सेवंत काम करणाऱ्या महिलासमोरील आव्हानांच्या कारणांचा शोध लावणे.

४ प्रस्तुत संशोधनातुन शासकिय सेवंत काम करणाऱ्या महिलासमोरील आव्हांनाच्या सोडवणुकीसाठी केलेल्या उपाययोजना पुरेशा आहेत की नाही याची माहिती मिळेल.

V संशोधन विषयाची मर्यादा / व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा लातूर जिल्हयापुरता मर्यादित आहे. कारण त्याचे कार्यक्षेत्र लातूर जिल्हयातील १० तालुके यापुरते मर्यादित असेल. तसेच याची व्याप्ती फक्त शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिला त्यामध्ये **पोलीस विभाग, टपाल विभाग, सरकारी दवाखाने, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायालय, बससेवा** पुरते मर्यादित राहिल.

VI नमुना निवड :—

प्रस्तुत संशोधन प्रकल्प हा जास्त व्यापक होऊ नये संशोधन कमी वेळेत आणि वस्तुनिष्ठ होण्यासाठी मी सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करणार आहे. त्यानुसार प्रत्येक तालुक्याला समान स्वरुपात नमुन्याची निवड करणार आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक विभागात, एकुण ८ महिलांना भेट देणार आहे. तसेच एका तालुक्यातील ६ विभागात एकुण ४८ महिलांना तर लातूर जिल्हयातील १० तालुक्यातील एकुण ४८० महिलांना पुढील प्रमाणे भेट देणार आहे. त्या महिलात प्रथम, द्वितीय, तृतिय,आणि चतुर्थ श्रेणीतील असतील.

VII संशोधन आराखडा :

सामाजिक संशोधनात संशोधनाचे उद्दिष्ट निश्चित झाल्यानंतर त्या उद्दिष्ट्यांपर्यत पोहचण्यासाठी नेमक्या कोणत्या मार्गाचा अवलंब करावा या विषयीचे संपूर्ण पूर्वनियोजन अभ्यासकाला करावे लागते यालाच संशोधन आराखडा म्हणतात.

'' सामाजिक अन्वेषणाची एक अशी तार्किक आणि व्यवस्थित योजना जी तथ्यसंकलन विश्लेषण तसेच मुल्यांकनाची पध्दतीचे म्हणजे आराखडा''

एकॉफ,'' निर्णय कार्यान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारीत करण्याचा प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात.''

संशोधन प्रकीयेला सुसुत्रता प्रदान करणारा एक महत्वाचा घटक म्हणून संशोधन आराखडयाचा उल्लेख केला जातो. संशोधनकर्त्याला संशोधन कार्याचे पूर्व नियोजन करावे म्हणुनच याला संशोधन कार्याचा आत्मा असे म्हटले जाते. प्रस्तुत अभ्यास विषय हा अनुभवाधिष्ठीत संशोधनाच्या कक्षेमध्ये येत असल्यामुळे, तथ्य संकलनाच्या दृष्टीने प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांचा आधार घेणार आहे. आभ्यासविषयाच्या उद्दिष्टापर्यंत निश्चितपणे पोहचता येईल आणि गृहितकृत्यांची पडताळणी करता येईल या दृष्टीकोनातुन संशोधनासाठी 'अन्वेष्णात्मक संशोधन आराखडयाची निवड करणार आहे. संशोधनाचे कार्य पुर्ण करण्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या तथ्यांचे संकलन करणे, तथ्य संकलनासाठी उपयुक्त तंत्राची निवड करणे, नमुना निवड तंत्राच्या सहाय्याने उत्तरदात्यांची निवड करणे आणि वेळेची, श्रमाची व पैशाची बचत या उद्देशाने वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करणार आहे. याच आराखडयाच्या माध्यमातून संकलित विविध तथ्यांमधील परस्पर संबंध दाखविण्याचा प्रयत्न करणार आहे.

VIII तथ्य संकलन :–

लातूर जिल्हयातील शासकिय सेवेत काम करणाऱ्या महिला समोरील आव्हांनाचा समाजशास्त्रीय अभ्यास या संशोधन विषयाच्या निमित्ताने तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा उपयोग करणार आहे. नमुना निवडीतील २४० महिलांचा तथ्यांचे संकलन करण्यासाठी आणि संशोधन पूर्ण करण्यासाठी या प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांची उपयोग करणार आहे. त्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे.

१. प्राथमिक तथ्य :–

नमुना निवडीतील २४० उत्तर दात्याकडुन तथ्याचे संकलन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोताच्या मुलाखत अनुसुची या तंत्राचा उपयोग करणार आहे. मुलाखत अनुसुचीची परीपुर्णता तपासून पाहण्यासाठी आणि तथ्यांचे संकलन योग्य प्रकारे होते आहे की नाही यासाठी सुरवातीला ''पथदर्शी अभ्यास '' चा उपयोग करणार आहे. प्राथमिक तथ्य संकलन करत असताना मुलाखत निरीक्षण व परीक्षण याच्या साहयाने महिलांचा वैवाहीक दर्जा, कुंटुबाचा स्वरुप, मुलांची संख्या, महिलांचे पद, कुंटूबात सदस्यांची संख्या, आरोग्य विषयक, नौकरी विषयक, आर्थिक बचती विषयक, शिक्षण विषयक, कामाची वेळ, ठिकाण, घरापासून ते कामाच्या ठिकाणचे अंतर, येण्याजाण्यासाठी वापरनारे साधन, पतीची नौकरी, इ. विषयक माहिती मी प्राथमिक स्त्रोताच्या आधारावर मिळविणार आहे.

२. दुय्यम तथ्य :

प्रस्तुत संशोधन विषयाचे काम पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या दुय्यम स्त्रोतांचा/ साधनाचा उपयोग करुन घेणार आहे. प्रबंध, जनरल शासकीय अहवाल, वर्तमान पत्रे, संदर्भग्रंथ, वैयक्तीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, रोजनिशी, पत्रे इ. साधनांचा वापर करणार आहे.

- **प्रस्तुत संशोधन आराखडा स्थुल स्वरुपाचा आहे. तर यात प्रत्यक्ष संशोधन करीत असताना काही बदल होऊ शकतात.**

IX कालावधी

प्रस्तुत संशोधन कार्य वर्ष २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

X प्रकरण रचना/मांडणी :—

१. महिलांची ऐतिहासिक पार्श्वभूमी :—

प्रस्तुत प्रकरणात स्त्रियांचा ऐतिहासिक आढावा, स्त्रियासमोरील शासकीय सेवेत काम करीत असताना आव्हानांची स्थिती आणि आतापर्यंत कोणी कोणी अभ्यास केला आहे याचा आढावा घेण्यात येईल त्याचबरोबर प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्हयाची स्थूल माहिती घेण्यात येईल.

२. संशोधन पध्दती :—

१. संशोधनाचे उद्दिष्टये

२. संशोधनाचे गृहितके

३. संशोधन आराखडा

४. नमुना निवड

५. तथ्य संकलन

६. पृथःकरण विश्लेषण

७. संशोधन अहवाल लेखन

३. सामाजिक आणि आर्थिक स्थिती :

अ) सामाजिक आव्हाने :

शासकीय सेवेत काम करत असताना स्त्रीला अनेक अशा सामाजिक आव्हानांना तोंड दयावे लागते त्यामध्ये कामाच्या ठिकाणी होणारा लैंगीक छळ हे एक महत्वाचे आव्हान आहे. कामाच्या ठिकाणी वरिष्ठ व सहकारी पुरुषांकडुन लैंगीक छळ होतो, कामाच्या ठिकाणी मनमोकळया पणाने वागल्यास स्त्रीच्या चारित्र्या विषयी संशय घेतला जातो व तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन चारीत्र्यहीन आहे असा होतो. शासकीय सेवा ही लोकसेवा असुन तिला अनेक वेगवेगळया वृत्तीच्या लोकांना सामोरे जावे लागते. कधी कधी राजकीय कार्यकर्ते, दबावगट, सामाजिक संघटनेतील लोक अनेक वेळा तिच्यावर दबाव, दडपण, धमकी, दाखविली जाते. बलात्कार, विनयभंग, पुरुषाची पूर्वगृहित दृष्टीकोन नेहमी स्त्रीयांना सहन करावा लागतो आणि त्यामध्ये स्त्रीला नेहमीच कनिष्ट समजुन हलक्या दर्जाची कामे दिली जातात. त्याच बरोबर कार्यालयातील अस्वच्छता, महिलांसाठी शौचालयाची असुविधता, अपुरी मनोरंजनाची साधने व अपुरेशी भोजन सुट्टी जर स्त्री गरोदर असेल तर तिला अपुऱ्या सुविधा त्याच बरोबर बाळंतपणाच्या नंतर बाळाला ठेवण्यासाठी पाळणा घर, शिशु सदनाची असुविधता, इत्यादी सामाजिक आव्हानांना सामोरे जावे लागते.

ब) आर्थिक आव्हान :—

शासकिय सेवेत काम करणाऱ्यांना अर्थिक आव्हानांना तोंड दयावे लागते स्त्रीला आपला पगार पतीच्या हवाली करावा लागतो पतीच्या सहमती शिवाय त्या खर्च करु शकत नाहीत. त्याच्या कमाईतुन घेतलेल्या वस्तुवर (घर, दागिने,वाहन,फर्निचर) यावर पतीची मालकी असते.आपणास ज्यांनी शिकविले नौकरीस लावले त्या आई वडीलांना अशा स्त्रीला पतीची सहमती नसेल तर मदत करु शकत नाही. प्रसुती संबंधीचे फायदे लवकर मिळत नाहीत. अपघात झाल्यास नुकसान भरपाई इ. सुविधा लवकर मिळत नाहीत, त्यांना विमा, भविष्य निर्वाह निधी अशा सुविधा सहजा सहजी मिळत नाहीत.

४. कौटुंबिक स्थिती :—

शासकिय सेवेत काम करणाऱ्या स्त्रीयांना नौकरी आणि कुटुंब या दोन्हीही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. गृहीणीवर कमावती स्त्री या दुहेरी भुमिकेचा ताण पडत असतो. दिवसभर नौकरी करुन आणि घरी आल्यावर आत्याचार स्वंयंपाक, धुणी—भांडी, मुलांना सांभाळणे, पतीची सेवा करणे, सासु—सासरे, दिर—नंनद, यांच्या अपेक्षा पुर्ण करणे इ. कामे करावी लागतात व पतिने आपल्या घर कामात मदत करावी असे वाटते परंतू पती ही कामे बायकांचीच आहेत असे सांगुन मदत करण्याचे टाळतात त्यामुळे स्त्रीया चिडचिड करतात.

पोलीस प्रशासनात काम करणाऱ्या स्त्रीयांना अवेळी अचानक नौकरीवर हजर राहवे लागते त्यामुळे कौटुंबिक कामे जागच्या जागी अर्धवट ठेवुन तिला जावे लागते. शासकीय सेवेतील कामाच्या अतिरेकामुळे स्त्रीयांचे वैवाहिक जीवन असमाधानी बनते. पती जर शारीरीक संबंधाला आग्रह करत असेल तर ती थकव्यामुळे ती सहकार्य करत नसेल तर दोघात निर्माण होणारे ताणतणावाला सामोरे जावे लागते. शासकीय सेवेत काम करत असताना स्त्रीयांना इतर पुरुषाशी मनमोकळे पणाचे संबंध ठेवणे भाग पडते काही वेळा उशिरापर्यंत त्यांच्या बरोबर काम करावे लागते हॉटेल मध्ये चहापान, नाष्टा, भोजन करावे लागते. रस्त्यात भेटल्यास आपुलकीने बोलावे लागते पती जर समजदार नसेल तर त्याला या गोष्टी आवडत नाहीत पत्नीच्या चारीत्र्याविषयी त्याच्या मनात संशय निर्माण होतो त्यातुन गैरसमज व संघर्ष वाढतो व त्याचे रुपांतर कुंटुब विघटनात होते व स्त्रीचे जीवन दु:खी व असमाधानी बनते.

५. कामाची वास्तविक स्थिती

सतत होणारी बदली :—

शासकीय सेवेत काम करणाऱ्या स्त्रीयांची सतत बदली होत असते त्यामुळे तिला नवीन गावी राहण्यासाठी जावे लागते. त्यामुळे पती एका गावी राहतो व पत्नी दुसरीकडे राहते. वारंवार होणाऱ्या बदलीमुळे मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो. त्याच बरोबर नवीन कार्यालयात बदला झाल्यामुळे तेथिल नवीन सहकार्याशी चटकन मिळता जुळता येत नाही, त्याच बरोबर कामाच्या ठिकाणी असुरक्षितता भासू लागते सतत होणाऱ्या बदलीमुळे अर्थिक समस्यांना सुध्दा तोंड दयावे लागते. अशा धावपळीच्या नौकरी मुळे तिच्या आरोग्यावर परीणाम होतो.

भ्रष्टाचार :—

शासकीय सेवेत दिवसेंदिवस भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत चाललेले दिसून येते म्हणुन शासकीय सेवेत काम करत असताना स्त्रीयांना भ्रष्टाचाराच्या समस्यला तोंड दयावे लागते वरीष्ट अधिकारी, सहकारी, कनिष्ट अधिकारी या सर्वच थरावर भ्रष्टाचार होत असतो, या भ्रष्टाचाराचा परीणाम कधी कधी तिलाही भोगावा लागतो. भ्रष्टाचार करणारे अधिकारी जबरदस्तीने धमकी दाखवुन तिच्या कडुन गैरकाम करुन घेतले जाते जर हा गैर व्यवहार उघडकीस आला तर तिलाही त्याची जिमेदार धरले जाते व शिक्षा केली जाते.

६. निष्कर्ष / शिफारस :—

प्रस्तुत संशोधन कार्यातुन जो निष्कर्ष येईल त्या या प्रकरणातुन मांडण्यात येईल व शासकीय सेवेत काम करणाऱ्या महिलासमोरील आव्हांनाची स्थिती जाणुन घेऊन त्या संबंधी निष्कर्षानुरुप सुचना व शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ :—

१. स्त्री—पर्व : मंगला सामंत

२. महिला सशक्तीकरण : सिध्दांत और वास्तविकता : डॉ. दिपाली सक्सेना

३. कामगार स्त्री : डॉ. सुशिला फुले

४. समाज राजनिती और महिलाएं दशा और दिशा : स्वप्नील सारस्वत, डॉ. निशांत सिंह

५. महिला श्रमिक सामाजिक स्थिती एंव समस्याएं : डॉ. जास्मीन लॉरेन्स

६. महिला विकास कार्यक्रम एंव योजनाएॅ : रिचा भुवनेश्वरी

७. महीला विकास : रमा शर्मा / एस.के. मिश्रा

८. भारतीय सामाजिक अधिनियम एंव समाजकल्याण डॉ. बी. एन.सिंग

९. समाजशास्त्रीय संशोधन पध्दती व तंत्रे : प्रा. रा.ना. घाटोळे

१०. सामाजिक समस्याएं : राम अहुजा

११. समाजशास्त्रीय संशोधन पध्दती : डॉ. प्रदिप आगलावे

१२. Surce of Internet